
PANDIT®
JAVDEKAR


# मनोरमा

प्रभात रोड वरील ३६वा पुनर्विकास प्रकल्प

मनात
भरून
उरणारी
एक
उत्कृष्ट प्रतिमा



# मनोरमा





# यशस्वितेची प्रभात,
# 'आपल्या पुण्यात!


विद्येचं माहेरघर असलेल्या पुण्याने जेव्हा कात टाकायला सुरुवात केली, तेव्हा नदीपलीकडच्या भागाला आधुनिक ओळख निर्माण होऊ लागली. प्रभात रोड हे या नव्या, आधुनिकतेचं प्रतीक. हिरवीगार झाडं, प्रफुल्लित परिसर, प्रदूषणमुक्त हवा, आणि टुमदार घरं! अनेक उच्चशिक्षित, सुसंस्कृत, कर्तबगार कुटुंबं इथे स्थायिक झाली. आणि प्रभात रोडला अभिरुचीसंपन्न चेहरामोहरा लाभला. काळाच्या पुढचा विचार करणारी माणसं इथे आली आणि याचंच प्रतिबिंब उमटलं इथल्या परिसराच्या जडणघडणीत, इथल्या घरांच्या बांधणीत.

# शालीन घरांचा सुरेख रस्ता

प्रभात रोडची घरं म्हणजे शालीन आणि खानदानी सुद्धा, आणि स्मार्ट आणि स्टायलिश सुद्धा. आयुष्यात काही साध्य केलेली इथली यशस्वी कुटुंबं, आणि त्यांची स्वप्नपूर्ती करणारी इथली मनस्वी घरं! प्रत्येक घर कसं भारदस्त. अगदी जीव लावून बांधलेलं. सर्वोत्तम तेच घेऊन साकारलेलं. आपल्या डौलदार घाटाने प्रभात रोडला एक ऐटबाज थाट देणारं. याच परंपरेतलं एक देखणं घर म्हणजे मनोरमा. आपटे कुटुंबाचं हे सुंदरसं जग. या कुटुंबाच्या यशस्वी वाटचालीचं साक्षीदार. त्यांच्या भरभराटीचं साथीदार. चला, जाणून घेऊ या मनोरमाचं अंतरंग, आणि त्याआधी, आपटे कुटुंबाची यशोगाथा!








# एक चिरंतन वारसा!

आपटे कुटुंबाला अढळ मूल्यांचा, कृतीशील उद्योजकतेचा आणि खिलाडू वृत्तीचा गौरवशाली वारसा लाभला आहे. ही शृंखला नावारूपाला आली ही तात्यासाहेब आपट्यांपासून. वामन श्रीधर आपटे म्हणजेच तात्यासाहेब (१८७५-१९५२) यांची अद्वितीय यशोगाथा आजही प्रेरणादायी आहे. मुंबईतल्या गिरगाव येथील खत्र्याची चाळ ते मूळजी जेठा मार्केट मधील कोहिनूर मिल्स टेक्स्टाईलचे एकमेव विक्री एजंट, ही तात्यासाहेबांची उत्तुंग भरारी थक्क करते. मुळात कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबातल्या व्यक्तीने कापड क्षेत्रात व्यावसायिक यश व प्रतिष्ठा मिळवणं हीच त्या काळी नवलाची व असामान्य गोष्ट होती. हुशारी, जिद्द, कष्ट, नेकी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व या व अशा अनेक गुणांमुळे तात्यांना हे यश मिळालं. व्ही. एस. आपटे अँड सन्स, सोलापूर येथील लक्ष्मी विष्णू मिल आणि कोहिनूर मिल्सला सलग पन्नास वर्ष लोकांचा विश्वास आणि सहकार्य लाभलं. कापड उद्योगातील हा एक विक्रमच मानला जातो. यशस्वितेचा हा वारसा आपटे कुटुंबाने जोपासला व पुढे नेला.




▲ कोहिनूर मिल नं. १ चे मेन गेट, मिल बंद झाल्यावर नंतरच्या काळातील छायाचित्र.




▲ कोहिनूर मिल्सची जाहिरात, ज्यात व्ही. एस. आपटे अँड सन्स असा उल्लेख आहे.



▲ वामन श्रीधर आपटे ऊर्फ तात्यासाहेब (१८७५ - १९५२)



▲ तात्यांच्या पत्नी, यमुनाबाई आपटे उर्फ काकू (१८८३-१९४६)

# आकांक्षांपुढती गगन ठेंगणे!

अनपेक्षितरीत्या चित्रपट क्षेत्रात पदार्पण करून तात्यासाहेबांनी तिथेही नावलौकिक मिळविला. नाशिकला दादाहेब फाळक्यांच्या सिनेमा स्टुडिओत त्यांची भागीदारी होती. सायलेंट फिल्मचे निर्माते म्हणून त्यांनी १०० पेक्षा अधिक फीचर फिल्म्सची निर्मिती केली. धडाडीच्या उद्योजकाचा पिंड असलेल्या तात्यासाहेबांनी चित्रपट निर्मिती, फलटणच्या साखर कारखान्याची स्थापना, राजमुंद्रीचा साखर कारखाना, सांगलीचा तेल, तंबाखू, साखर आणि कापड प्रकल्प, ओरिएंटलचा डबे कारखाना अशी व्याप्ती वाढविली.

तात्यासाहेबांचे सुपुत्र लक्ष्मण वामन आपटे म्हणजेच भाऊसाहेब आणि त्यांच्या पत्नी मनोरमाबाई आपटे. म्हणजे आत्ताचे जे विद्यमान मालक आहेत वामनराव आपटे आणि तेजस्विनी आपटे यांच्या त्या आजी. जितक्या प्रेमळ तितक्याच खंबीर. माणसं जोडण्याचा त्यांचा स्वभाव. सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची त्यांची वृत्ती. कलासक्त भाऊसाहेबांना गाण्याची, तर भाऊसाहेब व मनोरमाबाई दोघांनाही खेळाची आवड होती. यातूनच मुले माधव व अरविंद या दोघांवर खेळाचे संस्कार झाले, प्रोत्साहन मिळालं.

कुटुंब नियोजन या त्या काळी वर्ज्य असलेल्या क्षेत्रातही मनोरमाबाईंनी काम केले. या क्षेत्रातील द्रष्टे श्री. र. धों. कर्वे यांना भेटून त्यांनी स्वत: तर कुटुंब नियोजन अंमलात आणलेच, पण मुंबई व सोलापूर येथील मिल कामगारांमध्येही त्याचा प्रचार व प्रसार केला. पुढे १९६० च्या दशकाच्या सुरुवातीला मनोरमाबाईंनी शिवाजी पार्क येथील कोहिनूर मिल्स नं. ३ येथे 'नसबंदी केंद्र' सुरू करण्याचा धाडसी निर्णय घेतला.



▲ उसाच्या शेतामध्ये तात्या, त्यांच्या शेजारी स्वेटरमध्ये असेलेले त्यांचे पुतणे, फलटण शुगर वर्क्सचे मॅनेजर बाळासाहेब



▲ साखरवाडी येथील साखर कारखाना




▲ हिंदुस्थान फिल्म कंपनीने १९१८ मध्ये निर्मिती केलेल्या 'श्री कृष्ण जन्म' या पहिल्या चित्रपटाचे टायटल कार्ड




▲ व्हॉईसरॉय व भारताचे गव्हर्नर जनरल , द मार्क्विस ऑफ लिनलिथगो १९४१ मध्ये मोरारजी गोकुळदास स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्सला भेट द्यायला आलेले असताना



▲ मलेशियाचे पंतप्रधान मा. तुन रझाक, उसाच्या शेताला भेट देताना.






▲ मुंबई विद्यापीठाच्या संघात माधव आपटे



▲ नॉन-स्ट्रायकर्स एन्ड मधून बघताना माधव आपटे, समोर विनू मांकड पाकिस्तानी बोलरला लेट-कटिंग करताना, १९५२ मध्ये चेपॉक येथे.



▲ भारतीय संघ १९५३ मध्ये ब्रिजटाऊन, बार्बाडोस पॅव्हिलियन समोर, दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दरम्यान माधव आपटे.






▲ क्रिकेटच्या पोशाखातील तीन पिढ्या, अरविंद व त्यांची कन्या तेजस्विनी यांच्यासोबत ओव्हल स्टेडियम वर.


◀ माधव आपटे सर गॅरी सोबर्स यांच्यासह मुंबईतील घरी, २०१० मध्ये.



▲ माधव आपटे, इंडिया ब्लेझर घातलेले.




▲ माधव आपटे गोलंदाजी करताना, 'द बॉंबे सेंटिनेल' मध्ये बॉबी तल्यारखान यांच्या लेखात उल्लेख



▲ गाईल्ड शिल्ड विनर्स, विल्सन हाय स्कूल, १९४४-४५.

# क्रीडाक्षेत्रातील पाऊलखुणा

तात्यासाहेबांचे नातू माधव आपटे आणि अरविंद आपटे यांनी क्रिकेटच्या खेळात कर्तृत्व गाजविले. शैलीदार फलंदाज म्हणून नावलौकिक असलेल्या माधव आपटे यांनी अनेक खेळांत आपला ठसा उमटविला. क्रिकेट, स्क्वॉश, बॅडमिंटन, टेनिस, टेबल टेनिस या सर्व खेळांमध्ये त्यांना यश लाभलं. अनेक विजेतेपदे मिळाली.


माधव यांना क्रिकेट मध्ये शाळा, कॉलेज, विद्यापीठ, रणजी ट्रॉफी व अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवरही खेळण्याची संधी मिळाली. यश, प्रसिद्धी, त्यातील चढउतार पचविण्याची दृष्टी आणि ताकद दिली. वेस्ट इंडीज विरुद्ध नाबाद १६४ धावा काढणारे माधव आपटे, म्हणून लोकांचं भरभरून कौतुक त्यांना मिळालं. अरविंद आपटे हेही तंत्रशुद्ध बॅटिंगसाठी प्रसिद्ध होते. मुंबईकडून ते रणजी खेळले व भारतीय संघात एका कसोटीत खेळण्याची संधी मिळाली.

# पाऊल पडते पुढे...

पुढच्या पिढीने आणखी एक पाऊल पुढे टाकत वेगवेगळ्या क्षेत्रात पदार्पण केलं. माधव आपटे यांचे पुत्र वामन आपटे यांनी स्क्वॉश सारखा वेगळा खेळ निवडला आणि त्यात यश मिळविले. अरविंद आपटे यांच्या कन्या तेजस्विनी आपटे यांनी लेखिका म्हणून आपलं स्थान निर्माण केलं. तेजस्विनी आपटे यांनी आपले पणजोबा तात्यासाहेबांवर 'तात्यासाहेब आपटे- द स्टोरी ऑफ अ बॉम्बे आंत्रप्रीन्युयर' हे अतिशय उत्तम पुस्तक लिहिलं. मनोरमा बाईंनी प्रेमाच्या धाग्याने एकत्र बांधलेलं हे सुसंस्कृत, सुशिक्षित, आणि सुस्थापित कुटुंब आपला चिरंतन वारसा अभिमानाने जपत पुढे जात राहिलं.




▲ तेजस्विनी आपटे यांनी आपले पणजोबा तात्यासाहेबांवर लिहिलेले 'तात्यासाहेब आपटे- द स्टोरी ऑफ अ बॉम्बे आंत्रप्रीन्युयर' हे पुस्तक.



▲ आपटे कुटुंबाच्या पाच पिढ्या. फ्रेम मध्ये तात्या, भाऊसाहेब, माधव, वामन, व बाळ विक्रम, १९८३ मध्ये.




▲ तात्या व काकूंचा सुवर्ण महोत्सवी सोहळा



▲ संपूर्ण आपटे कुटुंब, २००४ मध्ये.



▲ माधव आपटे, त्यांच्या लाडक्या 'ब्यूईक' गाडी सह.



▲ माधव आपटे व सौ. शीला त्यांच्या विवाह प्रसंगी.




# पायाभरणी एका स्वप्नाची

अशा अभिरुचीसंपन्न आपटे कुटुंबाने आपलं घरकुल साकारण्यासाठी प्रभात रोडची निवड केली. १९५३ मध्ये तब्बल १९,५०० स्क्वेअर फुटांवर हा टुमदार दुमजली बंगला बांधला. प्रभात रोडच्या ८ व्या व ९ व्या गल्लीच्या मध्ये डौलाने उभ्या असलेल्या या बंगल्याने प्रभात रोडची शान आणखी वाढविली. बंगला बांधताना काळाच्या पुढचा विचार केल्यामुळे आगळंवेगळं व्यक्तिमत्व बंगल्याला लाभलं. आणि नाव देखील या व्यक्तिमत्त्वाला साजेसं, मनोरमाबाई आपटे यांच्या नावावरून ठेवलेलं...मनोरमा!



▲ मनोरमाबाई आपटे



▲ मनोरमाबाई व त्यांची मुले. डावीकडून उजवीकडे: माधव, कुमा, अरविंद, मंजू..

# जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर ते तेः

‘मनोरमा’ म्हणजे परिपूर्णता. विचारपूर्वक केलेलं डिझाईन. त्या काळातील सर्वोत्तम बांधकाम साहित्य वापरून केलेली ही अत्यंत आकर्षक वास्तुरचना होती. थोडा पुढचा विचार करून या बंगल्याच्या आतमध्ये एक २ बेडरूम अपार्टमेंट बांधलेलं होतं. या बहुपयोगी अपार्टमेंटचा अनेकांना अनेक वेळी उपयोग होत असे. उदाहरणार्थ, मुंबई व फलटण येथील साखरवाडी असा प्रवास करताना, साखर उद्योगातील उच्चपदस्थांना मुक्कामासाठी गेस्ट हाऊस म्हणून. किंवा आपट्यांची मित्रमंडळी किंवा नातेवाईकांना तातडीची गरज पडल्यास उतरण्यासाठी हक्काचं ठिकाण म्हणून.
अशा उदारतेने आपटे कुटुंबाने या घराचे सार्थक केले. चैतन्यशील, ठसठशीत आणि मोहक असं हे घर, त्याला लाभलेले खास त्या काळातलं ग्लॅमर. आणि म्हणून, प्रत्येकाने वळून वळून बघावं, आणि बघताक्षणी नजर खिळून प्रेमात पडावं असं होतं ‘मनोरमा’!







▲ थोडा पुढचा विचार करून मनोरमा बंगल्याच्या आतमध्ये एक २ बेडरूम अपार्टमेंट बांधलेले होते. आधुनिक शैलीत बांधलेल्या अपार्टमेंटमधील ही एक खोली.





# दूरदृष्टी ठेवून केलेली निर्मिती

त्या काळात दूरदृष्टीने केलेल्या अनेक गोष्टी आज या बंगल्याची खासियत ठरल्या. मनोरमाच्या मुख्य दरवाजातून आत आल्यावर समोरचा जिना नजरेत भरत असे. या जिन्याचं हॅन्ड रेलिंग आणि ट्रेड्स हे उत्कृष्ट दर्जाच्या व दुर्मिळ बर्मा टीक लाकडाचे होते. प्रवेश केल्यावर जिन्याच्या बाजूलाच एक सुंदर कॉन्सोल लक्ष वेधून घेई. यात काठ्या किंवा छत्र्या ठेवायची जागा व बाजूला आलेल्या पाहुण्यांचे कोट किंवा इतर काही लटकवण्याचे नक्षीदार हूक्स होते. बंगल्यात त्या काळात नाविन्यपूर्ण असलेल्या, १० बाय १० च्या मोझॅक टाईल्स अतिशय सुंदर पद्धतीने बसवलेल्या होत्या. त्यांचे उत्कृष्ट दर्जाचे पॉलिश अगदी आतापर्यंत जसेच्या तसे टिकले.





# भव्य, हवेशीर आणि प्रसन्न!

मनोरमा बंगला नुसता आकाराने नाही, तर विचारानेही मोठा होता. व्हरांड्यानंतर एक फॉर्मल सीटिंग व त्याच्यानंतर इन्फॉर्मल सीटिंग हे या बंगल्याचं खास वैशिष्ट्य. फॉर्मल सीटिंग हे बॅकयार्डला उघडत असे, तर इन्फॉर्मल सीटिंग मध्ये टीव्ही बघायची सोय होती. दरवाजे आणि खिडक्या यांच्यामध्ये सुद्धा काही विशिष्ट बारकावे होते. प्रत्येक दरवाजाला व्हेंटिलेशनचे लूव्हर्स असल्याने खोल्या हवेशीर राहात असत. सगळे दरवाजे टीक वूड किंवा बरमा टीकचे होते. प्रचंड मोठ्या साईजच्या विंडोज आणि कुठूनही बाहेर बघितल्यावर आणि बेडरूमच्या खिडकीतून प्रत्येक ठिकाणी नेत्रसुखाद बाग दिसत असे. लिविंग रूमला आणि डायनिंगला बॅकयार्ड होते. घराला सुंदर डिझाईनची अरिस्टोक्रॅटीक ग्रिल्स शोभून दिसत. एम एस प्लेट ६ एम एम मध्ये केलेल्या या ग्रिल्सना मनमोहक बाकदारपणा आणि त्या काळातलं उत्कृष्ट दर्जाचं फॅब्रिकेशन वर्क होतं.



▲ प्रशस्त व्हरांडा व व्हरांड्यातील इन्फॉर्मल सीटिंग




▲ सुंदर डिझाईनची अरिस्टोक्रॅटीक ग्रिल्स













# जुन्यानव्याचा सुरेख संगम

आपटे कुटुंबाच्या सगळ्या घरांची वास्तुरचना सुप्रसिद्ध 'मास्टर साठे अँड भुता' आर्किटेक्ट्स यांची होती. मनोरमा बंगलाही त्यांनीच डिझाईन केलेला होता. अद्वितीय आर्किटेक्चर आणि अभिजात वास्तुरचना यात जुन्या काळची आधुनिकता जाणवत असे. उदाहरणार्थ, बाथरूम मध्ये ड्राय एरिया व वेट एरिया स्वतंत्र करण्याची पद्धत त्या काळात नव्हती. मात्र मनोरमा मधल्या सगळ्या बाथरूम मध्ये स्वतंत्र ड्राय एरिया होता. बाथरूम मध्ये आत सुद्धा मोझॅक टाईल्स होत्या व त्या अतिशय आकर्षक दिसत. सगळं फर्निचर व अनेक लाईट फिटिंग्ज ही आर्ट डेको शैलीतील होती. हे सगळं फर्निचर, फिटिंग्ज आणि पंखे बंगला बांधला तेव्हा लावलेलेच अगदी आजच्या काळापर्यंत होते. बंगल्यात मोठे फोटो, कलात्मक वस्तू, पेंटिंग्स, अप्रतिम तैलचित्रं यांचा संग्रह होता. एका सिंगल लाकडातून तयार केलेली त्रिमूर्ती भगवानाची मूर्ती हे या संग्रहाचं खास आकर्षण.









▲ राधा-कृष्णाच्या या देखण्या मूर्तीमुळे 'मनोरमा' ला
मूर्ती बंगला म्हणूनही ओळखत.

# आजीच्या वास्तव्याच्या पाऊलखुणा

मनोरमाबाई आपटे ऊर्फ आज्जी यांना बागकामाचीही अतिशय आवड होती. गुलाबाची बाग त्यांनी फुलविली. मात्र भाज्या व फळं हा त्यांचा आवडीचा विषय होता. अनेक स्थानिक स्पर्धांमध्ये बक्षिसं मिळविली व सर्वोत्तम बगीचाचा पुरस्कारही त्यांना मिळाला होता. मनोरमा भोवती तब्बल १०,००० स्क्वेअर फुटची बहारदार बाग होती. हिरवाईत विसावलेलं हे शांत, प्रसन्न घरकुल कुटुंबीय, नातेवाईक, पाहुणेरावळे सर्वांनाच हवंहवंसं वाटे. रस्त्यावरूनही दिसणाऱ्या राधा-कृष्णाच्या मूर्तीमुळे मूर्ती बंगला म्हणूनही 'मनोरमा' ची एक खास ओळख होती, आणि आपटे कुटुंबाला आजही त्याचा अभिमान आहे.






PANDIT® JAVDEKAR

# आम्ही चालवू हा पुढे वारसा!

हा समृद्ध वारसा पुढे नेणं हे जबाबदारीचं काम आहे.
आम्ही अतिशय उत्साहाने व मनापासून ही जबाबदारी घेत आहोत.
कारण इतकी देखणी रचना व निर्मिती पुन्हा होणे नाही, याची आम्हाला जाणीव आहे.
बदलत्या काळाबरोबर पुढे जातानाच, या आठवणी, हे वैभव व ही अनोखी नाती जपण्याचा,
मनात भरून उरणारी ही उत्कट प्रतिमा अनुभवण्याचा आमचा प्रयत्न असेल.
पंडित जावडेकरचा हा ३६वा पुनर्विकास प्रकल्प. आता **‘मनोरमा’** नव्या रुपात साकारणार आहे.
‘जुनं ते सोनं’ यावरही आमचा विश्वास आहे, आणि या सोन्याचा झळाळ आणि त्याचं तेज यत्किंचितही
कमी होणार नाही, याची आम्ही सर्वतोपरी काळजी घेणार आहोत.




वारसा समृद्ध मूल्यांचा,
क्रीडाप्रेमी वृत्तीचा
आणि उद्योजकतेचा